''प्रेस नोट'' **दि.०३/११/२०२६**

'' १७ वर्षापासून खुनाच्या गंभीर गुन्हयामध्ये पाहिजे असलेल्या आरोपीस अटक केलेबाबत ''

दिनांक २०/०६/२००९ रोजी आरोपी फिरोज, अफरोज व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी आपआपसात संगणमत करून, गावाकडील जमिनीच्या जुन्या वादातून मयम इसम नामे मसकूर यास त्याचे डोक्यात हातोडा घालून जिवे ठार मारल्याने त्याबाबत तक्रार दिल्याने मुलुंड पोलीस ठाणे,मुंबई येथे गु.र.क्र. २१८/२००९ कलम ३०२,३४ भादंविस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी फिरोज मो.सुलेमान शेख वय ३९ वर्षे हा गुन्हा घडल्यापासून त्यांचे अस्तित्व लपवून राहत होता तसेच त्याचा राहते गावी व वेगवेगळया ठिकाणी शोध घेवूनही तो मिळून येत नव्हता म्हणून त्यास पाहिजे आरोपी म्हणून घोषित केले होते.

मा.वपोनि, मुलुंड पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि लभडे व पोउनि महाजन यांच्या पथकाने गुप्त बातमीदारांमार्फत व सखोल तांत्रिक तपास केला असता सदर आरोपी हा वेगवेगळी ठिकाणे, मोबाईल, सिम कार्ड बदलुन बनेली गांव, टिटवाळा,पूर्व येथे आपले अस्तित्व लपवुन एका कन्स्ट्रक्शन साईटवर फिटरचे काम करीत असल्याची व परिवारासह वास्तव्यास असल्याची माहिती प्राप्त झाली. तपास पथकाने मिळालेल्या माहितीनुसार आरोपीचे राहते ठिकाणी बनेली गाव, टिटवाळा येथे जाउन त्यास ताब्यात घेवुन आरोपीस त्याचे नाव, पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव फिरोज मो.सुलेमान शेख वय ३९ वर्षे, पत्ता - लक्ष्मण चाळ रूम नं ०२ बनेली चौक टिटवाळा पुर्व,(मुळ गाव- ग्राम-डोगज, सोनापूर पोस्ट, सुधाणी ता-बारसोई, जि-कटिहार, राज्य- बिहार) असे सांगितले. सदर आरोपीस लागलीच पोलीस ठाणेस आणुन त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने व त्याचे साथीदार यांनी मसकूर यास जुन्या भांडणाच्या रागातून त्याच्या डोक्यात हातोडा मारुन त्यास जीवे ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयाच्या तपास कामी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. देवेन भारती मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. मनोज कुमार मा. पोलीस सह-आयुक्त (का व सु), श्री. धनंजय कुलकर्णी, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, मुंबई. श्री. अभयसिंह देशमुख मा.पोलीस उप आयुक्त (पूर्व परिमंडळ- ३), श्री. सुदर्शन होनवडजकर ,मा.सहायक पोलीस आयुक्त (मुलुंड विभाग)यांचे मार्गदर्शनाखाली श्री संतोष घाटेकर ,व.पो.नि. मुलुंड पोलीस ठाणे यांचे देखरेखीखाली मुलुंड पोलीस ठाणेचे स.पो.नि.विनोद लभडे, पोउनि स्वप्निल महाजन, पो.हवा किरण चव्हाण,पो.हवा हेमंत शेडगे, पो.हवा राजेंद्र चौघुले,पोशि विवेक शिंपी, पोशि बळवंत करदोरे, पोशि सागर गावडे, पोशि मनेष सरकटे, पोशि विष्णु आव्हाड यांनी केलेली आहे.